स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

मानव्य विद्याशाखे अंतर्गत अर्थशास्त्र विषयात विद्यावाचस्पती (पीएच.डी.)
पदवीसाठी सादर केलेला संशोधन पूर्व आराखडा (Pre-Synopsis)

: संशोधनाचा विषय :

वर्धा जिल्ह्याच्या विकासात पायाभूत सुविधांची भूमिका : एक चिकित्सक अध्ययन

: संशोधक :

संतोष देविदास मोहधरे

एम.ए. (अर्थशास्त्र), बी.एड.,नेट., एम.फिल

: मार्गदर्शक :

प्राचार्य. डॉ. के. के. पाटील

शंकरराव चव्हाण महाविद्यालय, अर्धापूर, जि. नांदेड.

(माजी अध्यक्ष — ३६ वे वार्षिक राष्ट्रीय अधिवेशन तथा

कार्याध्यक्ष — मराठी अर्थशास्त्र परिषद, मुंबई)

: संशोधन केंद्र :

सामाजिक शास्त्रे संकुल,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड. — ४३१६०६

अनुक्रमणिका

अ. क्र.	शीर्षक	पृष्ठ क्र.
१	प्रस्तावना	३
२	संशोधनाचे महत्त्व	५
३	संशोधन समस्या	६
४	संशोधन विषयाची निवड	७
५	संशोधनाची उद्दिष्ट्ये	७
६	संशोधनाची गृहीतके	८
७	संशोधन पद्धती	८
८	संशोधनाची व्याप्ती व मर्यादा	९
९	संशोधन विषयाच्या प्रकरणांची रचना	१०
१०	संदर्भ ग्रंथ सूची व वार्षिक अहवाल	११

वर्धा जिल्ह्याच्या विकासात पायाभूत सुविधांची भूमिका : एक चिकित्सक अध्ययन

प्रस्तावना

जगातील सर्वच राष्ट्रांना आर्थिक विकास साध्य करण्यासाठी पायाभूत सुविधेची आवश्यकता असते. पायाभूत सुविधा राष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक विकासासाठी एक व्यापक पाया निर्माण करीत असतात. वर्तमान काळात मानवी गरजेनुसार पायाभूत सुविधांची निर्मिती करावी लागते. त्यामुळेच ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. जगातील कोणतीही मानवी वस्ती पायाभूत संरचनेच्या दृष्टीने परिपूर्ण असत नाही. याच कारणाने युरोप मध्ये सोळाव्या शतकापासून सुरू झालेला पायाभूत क्षेत्राचा विकास व विस्तार आजही सुरू आहे. पायाभूत क्षेत्रात विविध सेवा सुविधांची सातत्याने भर पडत आहे. आज देशाने विकासाचा मोठा टप्पा गाठला आहे. हा विकास शाश्वत करण्यासाठी भविष्यात पायाभूत सुविधांचे क्षेत्र महत्त्वाचे ठरणार आहे.

अर्थव्यवस्थेत आर्थिक विकासात पायाभूत सुविधांची भूमिका महत्त्वाची असते. कारण अशा प्रकारच्या पायाभूत सुविधांशिवाय कुठल्याही प्रदेशाचा सर्वांगीन विकास होवू शकत नाही. वास्तविकत: मानवाच्या सामान्य गरजा पूर्ण करून त्याच्या अर्थपूर्ण जगण्याला सहाय्यभूत होणाऱ्या सेवा म्हणजे पायाभूत सुविधा होय. ज्या प्रदेशात विविध प्रकारच्या पायाभूत सेवा सुविधा उपलब्ध असतात. तिथे लोकवस्तीचा विस्तार होतो. वीज, पाणी, बॅंक व विमा संस्था, शिक्षण, आरोग्य, वाहतूक व दळणवळणाच्या सुविधा इत्यादींना एकत्रितपणे अर्थव्यवस्थेच्या पायाभूत सुविधा म्हणतात.

प्रत्येक शतकात पायाभूत क्षेत्राच्या विकासात भर पडते आहे. एकविसाव्या शतकात पायाभूत क्षेत्राचे स्वरूप बदलत आहे. पायाभूत सुविधांच्या विविधतेत मोठी वाढ झाली आहे. म्हणूनच पायाभूत सुविधांचा अभ्यास करण्याकरिता त्यांची वेगवेगळ्या गटात विभागणी करावी लागते.

१) उर्जा क्षेत्रात वीज, गॅस, पेट्रोलियम पदार्थ

२) पायाभूत भौतिक सेवांमध्ये रस्ते, रेल्वे, पाणी आणि हवाई वाहतूक या साधनांचा समावेश केला जातो.

३) सामाजिक पायाभूत सेवांमध्ये शिक्षण, दवाखाने इत्यादींचा समावेश होतो.

४) नागरी सार्वजनिक आरोग्य सेवांमध्ये पाण्याचे नळ, गोदामे, शुद्धिकरण केंद्रे, सांडपाणी आणि मलनि:सारण त्याचबरोबर घनकचरा व्यवस्थापन यांचा समावेश होतो.

५) अग्नि प्रतिबंधाची सेवा सुरक्षा सेवा मानली जाते.

६) तंत्रज्ञान आणि दूरसंचार या नविन सुविधांनासुध्दा पायाभूत सेवा क्षेत्रात महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.

आज पायाभूत संरचनेची विकास प्रक्रिया आडव्या–उभ्या पध्दतीने वाढली आहे. एखादी पायाभूत सेवा भौगोलिक सीमा पार करत सर्वत्र पसरल्यास आडवा विस्तार म्हणतात. उदाहरणार्थ – पंपाच्या सहाय्याने नदीचे पाणी गावभर नळ टाकून पुरवण्याची पद्धत हा आडवा विस्तार होय. तसेच पाणी पुरवण्याच्या क्षेत्रामध्ये नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर होणे जसे विजेचे यंत्र, संगणक, मिटर यंत्र यांचा वापर होऊन सेवा प्रभावी, जलद आणि कार्यक्षम होणे म्हणजेच पायाभूत सुविधेचा उभा विकास होय. आडवा पायाभूत सुविधांचा भौगोलिक विस्तार आणि तंत्रज्ञानामुळे झालेला उभा विकास यांच्या बरोबरच तंत्रज्ञानाचा विकास या तिन्ही गोष्टी पायाभूत क्षेत्राच्या संदर्भात संशोधनास अतिशय महत्त्वाच्या ठरतात.

महाराष्ट्र राज्य हे भारतातील अग्रेसर राज्य बनले. त्यात पायाभूत सुविधांची फार मोठी भूमिका आहे. परंतु महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपासूनच मराठवाडा, विदर्भ, कोकण व पश्चिम / उर्वरीत महाराष्ट्र यांच्या विकासात तफावत आहे. म्हणूनच विदर्भ व मराठवाडा प्रदेशाचे मागासलेपण मोजण्यासाठी वि.म.दांडेकरांच्या अध्यक्षतेखाली एक सत्यशोधन समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीने विकासाचे मोजमाप करण्याकरीता जिल्हा हा निकष मान्य केला.

विदर्भातील वर्धा जिल्ह्याला राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या सेवाग्राम आश्रमामधील वास्तव्यामुळे आंतरराष्ट्रीय ओळख प्राप्त आहे. वर्धा जिल्ह्याचे क्षेत्रफळ ६३०९ चौ. कि. मी. असून महाराष्ट्र राज्याच्या एकूण क्षेत्रफळाच्या दोन टक्के आहे. २०११ च्या जनगणनेनुसार वर्धा जिल्ह्यातील ६८.६ टक्के कुटूंबे ग्रामीण भागात व ३१.४ टक्के कुटुंबे नागरी भागात निवास करतात. या संदर्भाने एका विशिष्ट प्रदेशातील सामाजिक, आर्थिक विकासात पायाभूत सुविधांची भूमिका तपासून व्यवहार्य उपाययोजना सुचविणे हा संशोधनाचा उद्देश आहे.

संशोधनाचे महत्त्व :—

आधुनिक काळात जगातील कोणत्याही देशाच्या विकासाची स्थिती ही त्या देशातील सर्वसामान्य लोकांकरीता उपलब्ध पायाभूत सेवा सुविधांनुसार ठरत असते. भारतात पायाभूत क्षेत्राचा विकास हा शहरी व ग्रामीण भागात विषम स्वरूपाचा दिसतो. ही बाब देशाच्या जलद आर्थिक विकासाला मारक ठरत आहे.

पायाभूत सुविधांचा विकास आणि जलद आर्थिक विकास यांचे जवळचे नाते आहे. पायाभूत सुविधांच्या विकासामुळे बाजारपेठांचा विस्तार होतो. जलद उत्पादन वाढवणारे तंत्रज्ञान विकसीत होतात. बहि:शाल शिक्षण घेणाऱ्यांमध्ये वाढ होते. विपणनाची नवी क्षेत्रे निर्माण होतात. वाहतूक खर्चावरील कपात, वेळेची बचत व नाशिवंत उत्पादनांना लाभ होतो.

पायाभूत सुविधेमुळे ग्रामीण भागातील लोकांना शाळा, महाविद्यालये, दवाखाने, बाजार, व धार्मिक स्थळांनाही जाणे शक्य होत आहे. बस सेवा सुरू झाल्याने शाळेला जाणाऱ्या मुलांच्या संख्येतही वाढ होत आहे. तसेच शेती क्षेत्रातील नगदी पिकांच्या लागवडीत वाढ होत आहे. रस्ते व दळणवळणाच्या साधनसुविधेमुळे ग्रामीण भागात गॅस कनेक्शनची वाढ होत आहे. इत्यादींमुळे नागरीकांचे जिवनमान उंचावण्यात मदत होते. तसेच इतर आर्थिक, सामाजिक लाभ लोकांना प्राप्त होतात.

म्हणूनच सन २०१५ मध्ये संयुक्त राष्ट्र परिषदेत सामाजिक व आर्थिक बाबींवर भर देऊन लोकांच्या सर्वांगीन विकासासाठी शाश्वत विकास ध्येये निर्धारीत केली आहेत. त्यात पायाभूत सुविधांचा विकास हे एक ध्येय निर्धारीत आहे. या दृष्टीने देशाच्या सर्व स्तरावर पायाभूत सुविधांच्या विकासावर लक्ष केंद्रीत केले जात आहे.

या पार्श्वभूमीवर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०२१, संदर्भ वर्ष २०२०—२१ नुसार वर्धा जिल्ह्यात ६८.३४ टक्के गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई आहे. नळाद्वारे पाणी उपलब्ध होण्याची सुविधा फक्त २७.२३ टक्के गावापर्यंत मर्यादीत आहे. त्यामुळे जिल्ह्यातील अशा जीवनावश्यक पायाभूत सुविधांचा अभ्यास करणे महत्त्वपूर्ण वाटते. जेणेकरून या उणिवा भरण्यास व त्यावर प्रकाश पाडण्यास मदत होईल.

- जिल्ह्यातील पायाभूत सुविधेच्या विषमतेची जाणीव होईल.
- पायाभूत सुविधेमुळे संबंधित प्रदेशाचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतीक विकास कसा होतो ते समजते.
- वर्धा जिल्ह्याच्या तालुकानिहाय पायाभूत सुविधेतील कमतरतेची कारणे व त्यावर उपायांचे आकलन होईल.
- तालुकानिहाय विकासात राहिलेल्या त्रुटी, अडचणी, समस्या व त्यावरील उपाय सुचवण्यासाठी हा संशोधन प्रकल्प उपयुक्त सिध्द होईल.

संशोधन समस्या :—

गेल्या चारशे वर्षांच्या कालावधीत लोकसंख्येमध्ये झालेली वाढ आणि त्यामुळे रस्ते, पाणी, वीज आणि वाहतूक यांच्या पुरवठ्यामध्ये वाढ करणे आवश्यक झाले आहे. आज भारतात लाखो कुटूंबांना घरे, आरोग्यसेवा, शिक्षण, रस्ते, वीज, सिंचन व पिण्याच्या पाण्याचा तीव्र अभाव जाणवत आहे. पायाभूत सुविधा क्षेत्रातील मागणी व पुरवठा यातील तफावत फार मोठी आहे. त्यामुळे आर्थिक विकासात पायाभूत क्षेत्रांची भूमिका हा विषय संशोधनासाठी महत्त्वाचा ठरतो.

पायाभूत सुविधांच्या विकासामुळे लोकांना शेतीपेक्षा वेगळी व्यावसायिक कामे करण्याची संधी निर्माण होते. ''कृषी क्षेत्रात दिर्घकालीन स्वयंपूर्णता साधायची असेल तर पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक वाढवणे आवश्यक ठरते.'' **''बार्कर—हयामी प्रारुपानुसार रेडॉल्फ बार्कर व युजिरो हयामी या दोन अर्थशास्त्रज्ञांनी १९७० च्या दशकात अमेरिकन जर्नल ऑफ ॲग्रीकल्चरल इकॉनॉमिक्स मध्ये आपला हा सिध्दांत मांडला.''**

दुसरी समस्या ही की, आर्थिक असमानता ही पायाभूत सुविधांच्या कमतरतेमुळे निर्माण होत असते. पायाभूत सुविधांतील असमान विकासामुळे पारंपरीक शेती क्षेत्रातून स्थलांतर होवून नागरी भागात लोकसंख्येची गर्दी होत आहे. यामुळे ग्रामीण भागातील लोकसंख्या विरळ होवून तिची गुणवत्ता कमी होण्याची समस्या निर्माण होवू शकते.

पायाभूत क्षेत्रातील गुंतवणूक शहरी भागात प्राथमिकतेने केली जाते व ग्रामीण भागाकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही. ही वस्तुस्थिती आहे. म्हणूनच पायाभूत सुविधांमध्ये येणाऱ्या समस्यांचा अभ्यास, त्याचे संशोधन, सुधारणा स्थानिक परिस्थितीनुसार करावे लागतात.

पायाभूत क्षेत्र हे आर्थिक विकासाला गती देण्याचे काम करते. त्यामूळे अशा पायाभूत सुविधांच्या उपलब्धतेवर विकासाचा पुढील टप्पा अवलंबून असतो. या अनुषंगाने पायाभूत सुविधाची आर्थिक विकासातील भूमिका तपासून पाहणे गरजेचे आहे.

संशोधन विषयाची निवड :

आर्थिक व सामाजिक विकासात सक्षम पायाभूत सुविधा असणे हा एक महत्त्वपूर्ण घटक आहे. लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी पायाभूत सुविधांची उपलब्धता महत्त्वाची ठरते. फक्त उत्पन्नामध्ये वाढ घडवून राहणीमानाचा उत्तम दर्जा प्राप्त होऊ शकेल असे नाही. त्यासाठी लोकांना दर्जेदार, विश्वसनीय, शाश्वत व सक्षम पायाभूत सुविधा सर्वांसाठी किफायतशीर उपलब्ध असणे आवश्यक आहे.

ज्या भागामध्ये पायाभूत सुविधांचा विकास झालेला आहे, तिथे आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकास झालेला दिसून येतो. उदा. वर्धा जिल्ह्यातील वर्धा, हिंगणघाट, देवळी, आर्वी, या तालुक्यांना पायाभूत सुविधांचे अनेक फायदे मिळतात. अनेक प्रशिक्षित, शिक्षीत व्यक्ती आकर्षित होतात. लोकवस्तीमुळे महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधांचा विकास होत जातो. जसे शैक्षणिक सुविधा, वाहतूक सुविधा, वैद्यकिय सुविधा, हॉटेल, इत्यादी.

याउलट समुद्रपूर, आष्टी, कारंजा, सेलू या तालुक्यात पायाभूत सुविधांचा कमी विकास झालेला जाणवतो. वरील सर्व असमतोल कमी करण्याकरीता प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यामुळे वर्धा जिल्ह्यातील तालुक्यांचा तुलनात्मक अभ्यास करून अविकसीत भागांच्या मागासलेपणाची कारणे जाणून विकासात पायाभूत सुविधांची भूमिका स्पष्ट करणे आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :

संशोधकाने या अभ्यासाची पुढील उद्दिष्टे निर्धारीत केली आहेत.

१) वर्धा जिल्ह्यातील पायाभूत सुविधांचा अभ्यास करणे.

२) आर्थिक विकासात पायाभूत सुविधांची भूमिका तपासणे.

३) पायाभूत सुविधांची उपलब्धता व सामाजिक, आर्थिक यांतील सहसंबंध तपासणे.

४) जिल्ह्यातील सामाजिक पायाभूत सेवा सुविधांचा अभ्यास करणे.

५) पायाभूत सुविधांच्या अभावामुळे निर्माण झालेल्या समस्यांचा अभ्यास व उपाय सुचित करणे.

संशोधनाची गृहीतके :—

१) पायाभूत सुविधांची उपलब्धता व सामाजिक, आर्थिक स्थिती यात सहसंबंध आहे.

२) पायाभूत सुविधा व नागरीकांचे जीवनमान यांत कार्यकारणसंबंध आढळतो.

३) ग्रामीण व नागरी सामाजिक पायाभूत सुविधांमध्ये विषमता आढळते.

संशोधन पध्दती :

प्रस्तावित संशोधनाकरिता अन्वेषनात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यांत येणार आहे. हे संशोधन प्राथमिक व द्वितीय साधन सामग्रीवर आधारीत असणार आहे. २०१०—११ ते २०२०—२१ या कालखंडात वर्धा जिल्ह्यातील विकासात पायाभूत सुविधांची भूमिका अभ्यासण्यासाठी शासनाचे वेळोवेळी प्रकाशित अहवाल, जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन वर्धा जिल्हा अहवाल व इतर संदर्भग्रंथ यांचा उपयोग करण्यांत येणार आहे.

प्राथमिक आधार सामग्रीमध्ये वर्धा जिल्ह्यातील नागरीकांकडून प्रत्यक्ष अनुसूची भरून घेवून वर्धा जिल्ह्याच्या आर्थिक विकासात पायाभूत सुविधांची भूमिका अभ्यासली जाणार आहे.

नमुना निवड :—

प्रस्तावित संशोधन विषयाचे आधार सामग्री संकलन करण्यासाठी गैरसंभाव्यता नमुन निवड पध्दती अंतर्गत सहेतूक नमुना निवड पध्दतीचा उपयोग करण्यांत येणार आहे. वर्धा जिल्ह्यातील आर्थिक विकासात पायाभूत सुविधांची भूमिका अभ्यासण्यासाठी वर्धा जिल्ह्यातून अनुसूची भरून त्याचे विश्लेषण केले जाणार आहे.

जिल्ह्यातील एकूण ०८ तालुक्यांतील प्रत्येक तालुक्यातून ११ गावे निवडल्या जाईल. जिल्ह्यातील एकूण ०६ शहरे **(वर्धा, आर्वी, हिंगणघाट, सिंदी (रेल्वे), देवळी, पुलगांव)** व ०६ गणना शहरे **(सिंदी (मेघे), पिपरी (मेघे), वरूड, नालवाडी, बोरगांव (मेघे), सावंगी (मेघे))** यांची निवड केली जाईल. या पध्दतीने १०० साधा सहेतुक नमुना निवड करण्यांत येणार आहे.

संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा :

१) संशोधनाची व्याप्ती :—

प्रस्तावित संशोधन क्षेत्र हे महाराष्ट्रातील विदर्भ प्रदेशांतर्गत येणाऱ्या वर्धा जिल्ह्यातील पायाभूत सुविधा संदर्भातील आहे. त्यामुळे वर्धा जिल्ह्यातील संपूर्ण पायाभूत सुविधांची तालुका निहाय आकडेवारी गोळा करून त्याचा विश्लेषणात्मक अभ्यास करणे ही संशोधनाची व्याप्ती राहील.

२) संशोधनाच्या मर्यादा :—

पायाभूत सुविधा या नागरी भागापर्यंत मर्यादीत असतात. त्या ग्रामीण भागात अपुऱ्या प्रमाणात आढळतात. त्यामुळे जिल्हा स्तरावरील संशोधन कार्यात अनेक अडचणी निर्माण होवू शकतात. या सर्व मर्यादा लक्षात घेवून त्या नियंत्रणात ठेवण्याचा प्रयत्न केला जाईल. संशोधन क्षेत्र वर्धा जिल्ह्यापुरते असून संशोधनाकरीता २०१०—११ ते २०२०—२१ हा कालावधी मर्यादीत केला गेला आहे.

संशोधन विषयाच्या प्रकरणांची रचना :

प्रस्तावीत संशोधन ‘‘वर्धा जिल्ह्याच्या विकासात पायाभूत सुविधांची भूमिका : एक चिकित्सक अध्ययन’’ या प्रमाणे निश्चित केला असून पाच प्रकरणात विभागला आहे.

प्रकरण पहिले : विषयाची ओळख व संशोधन पध्दती :

या प्रकरणात पायाभूत सुविधांचा अर्थ, पायाभूत सुविधांचे विकासातील महत्त्व नमूद करण्यांत येईल. या प्रकरणात अध्ययन विषयाची निवड, उद्दिष्ट्ये, संशोधन पध्दती, कालखंड, मर्यादा इत्यादींचा अभ्यास करण्यांत येईल.

प्रकरण दुसरे : संशोधन साहित्याचा आढावा :

या प्रकरणात अभ्यासाशी निगडीत असलेल्या संशोधन साहित्याचा आढावा घेण्यात येईल. यात पायाभूत सुविधेच्या विकासाच्या अभ्यासासंदर्भात निरनिराळ्या संशोधकांची मते नमूद केली जातील.

प्रकरण तिसरे : वर्धा जिल्ह्यातील पायाभूत सुविधा :

या प्रकरणात वर्धा जिल्ह्याची ऐतिहासीक व भौगोलिक पार्श्वभूमी अभ्यासून वर्धा जिल्ह्यात निर्माण झालेल्या पायाभूत सुविधांचे सविस्तर विश्लेषण करण्यांत येणार आहे. त्यात दळणवळणाची साधने, शाळा/महाविद्यालये, बॅक, दवाखाने, रस्ते, रेल्वे इत्यादी पायाभूत सुविधांचे अध्ययन करण्यांत येणार आहे. विशेषत: पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, दुरसंचार, पोस्ट आणि दुरध्वनीसेवा, ग्रामीण भागातील गॅस कनेक्शन्स व इतर सार्वजनिक सेवांमध्ये क्रिडा संकूले, क्रिडांगणे, व्यायाम शाळा, इत्यादींचा अभ्यास करण्यांत येणार आहे.

प्रकरण चौथे : वर्धा जिल्ह्यातील पायाभूत सुविधांचे सांख्यिकीय विश्लेषण

प्रस्तावित प्रकरणात संकलीत प्राथमिक माहितीच्या आधारे वर्धा जिल्ह्यातील सामाजिक, आर्थिक परिस्थिती व पायाभूत सुविधा यांतील सहसंबंध तपासला जाईल. जिल्ह्यातील पायाभूत सुविधांमुळे नागरीकांच्या जीवनमानात झालेल्या बदलांचे विश्लेषण केले जाईल.

प्रकरण पाचवे : निष्कर्ष आणि शिफारशी

या प्रकरणात विश्लेषणाच्या माध्यमातून प्राप्त झालेल्या निष्कर्षाची नोंद व काही शिफारशीही सुचविण्यात येणार आहे. निष्कर्षासोबतच गृहीतकांची संशोधन प्रणालीच्या अद्यावत मार्गदर्शक तत्त्वाप्रमाणे सांख्यिकीय पडताळणी करण्यांत येणार आहे.

संदर्भ सूची :

१) कविमंडन विजय, (२००९), विकासाचे अर्थशास्त्र, विद्याप्रकाशन.

२) घोडके अमोल, (२०१३) 'भारतातील मानव संसाधन विकास', युनिक ॲकॅडमी.

३) दांडेकर वि. म., (१९६०), महाराष्ट्राची सामाजिक, आर्थिक पाहणी, पुणे.

४) दास्ताने संतोष, (२०१२), महाराष्ट्र २०१२, नितीन प्रकाशन, पुणे.

५) देशपांडे विनायक, (२००५), भारतीय अर्थव्यवस्था, हिमालय प्रकाशन.

६) पाटील जे. एफ., (२००४) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०२१, वर्धा जिल्हा, जिल्हा सांख्यिकी कार्यालय, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, वर्धा.

२), वृध्दी व विकासाचे अर्थशास्त्र, भाग्यश्री प्रकाशन.

७) 'पायाभूत भौतिक सुविधा', (२०१०), निवडक समाज प्रबोधन पत्रिका : खंड ३, लोकवाङ्मय गृह.

८) पेडगांवकर राम व उत्तम, (१९९८), महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन.

९) बोधनकर सुधीर, (२०११), सामाजिक संशोधन पद्धती, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.

१०) भांडारकर पु. ल., (२०००), सामाजिक संशोधन पद्धती, विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर.
११) भांडारकर आर. बी., (जाने—जुन २०१४), महाराष्ट्रातील आधारभूत संरचनेचा विकास, अर्थमीमांसा,

१२) मिश्र, पुरी, 'भारतीय अर्थव्यवस्था', हिमालया पब्लिशिंग हाऊस, २००८.

खंड ७, अंक १.

वार्षिक अहवाल :

१) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०२१, वर्धा जिल्हा, जिल्हा सांख्यिकी कार्यालय, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, वर्धा.

२) महाराष्ट्राच्या समतोल प्रादेशिक विकासाच्या प्रश्नावरील उच्चस्तरीय समितीचा अहवाल, (ऑक्टो— २०१३), नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन.

३) महाराष्ट्र वार्षिकी २०१७, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.

४) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०२१—२२, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

—: संशोधक :—

<u>संतोष देविदास मोहधरे</u>

एम.ए. (अर्थशास्त्र), बी.एड.,नेट., एम.फिल

—: मार्गदर्शक :—

<u>प्राचार्य. डॉ. के. के. पाटील</u>

शंकरराव चव्हाण महाविद्यालय, अर्धापूर जि. नांदेड.

(माजी अध्यक्ष — ३६ वे वार्षिक राष्ट्रीय अधिवेशन तथा कार्याध्यक्ष — मराठी अर्थशास्त्र परिषद, मुंबई)